# प्रवेश घेताना उत्तम दर्जाचे महाविद्यालय महत्त्वाचे

## डॉ. गोरक्ष गर्जे : वाघ संस्थेतर्फे प्रवेशाबाबत समुपदेशन सत्रास उत्स्फूर्त प्रतिसाद

नाशिक : प्रतिनिधी

प्रवेश घेताना शाखा महत्त्वाची नसून, उत्तम दर्जाच्या महाविद्यालयात प्रवेश घेणे महत्त्वाचे आहे. तसेच अर्ज भरताना घ्यावयाची काळजी, प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक गुणपत्रिका, जात अथवा पडताळणी प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गाचे प्रमाणपत्र, दिव्यांग प्रमाणपत्रासह इतर आवश्यक प्रमाणपत्रे आणि कागदपत्रे तयार ठेवणे सर्वाधिक जबाबदारी व महत्त्वाचे असल्याचे मार्गदर्शन तंत्रशिक्षण संचालनालय, नाशिकचे सहसंचालक डॉ. गोरक्ष व्ही. गर्जे यांनी केले.




सीईटीचा निकाल जाहीर झाल्यानंतर अभियांत्रिकी व कृषी संलग्न विद्याशाखांच्या प्रवेशप्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या प्रवेशप्रक्रियेविषयी विद्यार्थी व पालकांमध्ये असलेला संभ्रम दूर करण्यासाठी के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे नुकतेच समुपदेशन व मार्गदर्शन कार्यशाळा शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी सभागृह, गंगापूर रोड येथे पार पडले. याप्रसंगी डॉ. गोरक्ष व्ही. गर्जे हे प्रमुख मान्यवर म्हणून बोलत होते. अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. डी. एम. चांदवडकर, अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी आपल्या प्रास्ताविकात के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात उपलब्ध असणाऱ्या विविध शाखा, महाविद्यालयाला स्वायत्तता मिळाल्याने करण्यात आलेले बदल, एन. बी. ए. व नॅक मानांकन व त्यातून स्पष्ट होणारा उच्च प्रतीच्या शैक्षणिक दर्जा, महाविद्यालयाचे विविध उपक्रम याबाबत पालक-विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे के. के. वाघ अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. एन जी देवशेटे यांनी कृषी प्रवेशप्रक्रियेसंबंधित माहिती दिली. विभागप्रमुख डॉ. डी. एम. चांदवडकर यांनी विद्यार्थी-पालकांना मार्गदर्शन करताना प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशाचा अर्ज सादर करणे, प्रवेशप्रक्रियेतील विविध टप्पे, अर्ज भरताना घ्यावयाची काळजी, ऑप्शन फॉर्म भरण्याची पद्धत आवश्यक कागदपत्रे आदींबाबत माहिती दिली त्यानंतर त्यांनी महाविद्यालये तसेच सीईटी कक्षामार्फत वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणारे वेळापत्रक, माहिती पुस्तिका व सूचनांचे काटेकोरपणे वाचन व पालन करावे, असे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष मा. समीर वाघ, सर्व संचालक मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी केले.

Gavkari 22-06-2023

# वाघ अभियांत्रिकीची प्रकल्प स्पर्धा



**नाशिक । दि. २४ प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाच्या आय.क्यु.एस.सी. सेलमार्फत नुकतीच अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची प्रकल्प प्रदर्शन व पारितोषिक वितरण स्पर्धा पार पडली. यांत विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांना प्रथम, संगणक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना द्वितीय तर मेकॅनिकल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना तृतीय पारितोषिक प्राप्त झाले.

उद्घाटन प्राचार्य तथा संचालक डॉ. केशव नांदूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शनात विविध विभागातील ३०२ प्रकल्पांपैकी २६ प्रकल्प स्पर्धेसाठी निवडण्यात आले. त्यापैकी सर्वोत्कृष्ट ७ प्रकल्पांना एकूण ३०,००० हजार रुपयांचे रोख पारितोषिके देण्यात आली. डॉ. केशव नांदूरकर, डॉ. शिरीष साने, डॉ. प्रीती भामरे, प्रा. नितीन शहाणे यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांपैकी काही प्रकल्प अत्यंत नाविन्यपूर्ण असून त्यांना पेटंट मिळू शकतात अशी माहिती डीन कालिटी डॉ.प्रीती भामरे यांनी दिली. मिलिंद टांकसाळे, सुयोग झुटे, तनुजा दाते यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून कामकाज पाहिले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सर्व संचालक मंडळ, संस्थेचे सचिव प्रा.के.एस.बंदी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले.

**Deshdoot 25-06-2023**

दिव्य मराठी
नाशिक सिटी 25-06-2023



# 'व्हॅक्युम सीड ड्रिल' ठरला ३०२ प्रकल्पातून अव्वल

## राज्यस्तरीय स्पर्धेत नाशिकच्या विद्यार्थ्यांचे यश



विजयी ठरलेल्या नाशिकच्या संघातील विद्यार्थ्यांसह मान्यवर.

### सर्वोत्कृष्ट ७ प्रकल्पांना ३० हजारांचे पारितोषिक

**प्रतिनिधी** | नाशिक

के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाच्या आय. क्यू. एस. सी. सेलतर्फे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात विद्युत अभियांत्रिकीचे विशाल बागल, प्रयाग श्रेयश, नरेश शिंदे, स्वप्नील सूर्यवंशी यांनी तयार केलेल्या 'डिझाइन ऑफ व्हॅक्युम सीड ड्रिल फॉर ॲग्रिकल्चर पर्पज' या प्रकल्पास प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांना प्रथम, संगणक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना द्वितीय तर मेकॅनिकल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. स्पर्धेत विविध विभागांतील ३०२ प्रकल्पांपैकी २६ प्रकल्प स्पर्धेसाठी निवडण्यात आले. सर्वोत्कृष्ट ७ प्रकल्पांना एकूण ३० हजार रुपयांची रोख पारितोषिके देण्यात आली. प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, डॉ. शिरीष साने, डॉ. प्रीती भामरे, प्रा. नितीन शहाणे यांच्या उपस्थितीत पारितोषिके देण्यात आली. डॉ. अभिषेक श्रीवास्तव यांनी प्रकल्पास मार्गदर्शन केले. संगणक अभियांत्रिकीचे श्रेयस गांगुर्डे, अथर्व भांगे, प्रथमेश सुजगुरे, गौरव ताजनपुरे यांच्या 'व्हर्च्युअल गाइड टू प्रोव्हाइड इमर्सिव्ह एक्सपिरियन्स ऑफ गोदा पार्क युजिंग व्ही. आर' या प्रकल्पास दुसरे पारितोषिक मिळाले. तिसरे पारितोषिक 'डिझाइन अँड डेव्हलपमेंट ऑफ चेसिस सेरीज' या प्रकल्पास मिळाले.

# थोडक्यात

## वाघ शिक्षण संस्थेतर्फे बुधवारी एकपात्री नाटक



नाशिक : के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या वतीने बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बुधवारी (दि. २८) सायंकाळी ५.३० वाजता परशुराम साईखेडकर नाट्यगृहात 'योद्धा संन्यासी : स्वामी विवेकानंद' हे एकपात्री नाटक आयोजित करण्यात आले आहे. दामोदर रामदासी या नाटकाचे सादरीकरण करणार असून, विवेकानंद केंद्राचे संचालक विश्वास देवकर अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

Maharashtra times 26-06-2023

# वाघ अभियांत्रिकीत प्रकल्प स्पर्धेला प्रतिसाद

## विद्युत अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी पटकावला प्रथम क्रमांक

▸ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २५ : के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाच्या आयक्यूएसी सेलमार्फत नुकतीच अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची प्रकल्प प्रदर्शन व पारितोषिक वितरण स्पर्धा पार पडली. यात विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांना प्रथम, संगणक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना द्वितीय, तर मेकॅनिकल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. प्रदर्शनात विविध विभागातील ३०२ प्रकल्पांपैकी २६ प्रकल्प स्पर्धेसाठी निवडण्यात आले. त्यापैकी सर्वोत्कृष्ट ७ प्रकल्पांना एकूण ३० हजार रुपयांचे रोख पारितोषिके देण्यात आली. डॉ. केशव नांदूरकर, डॉ. शिरीष साने, डॉ. प्रीती भामरे, प्रा. नितीन शहाणे यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. विद्युत अभियांत्रिकीचे विशाल बागल, प्रयाग श्रेयश, नरेश शिंदे, स्वप्नील सूर्यवंशी यांनी तयार केलेल्या 'डिझाईन अँड व्हॅक्यूम सीड ड्रिल फॉर ॲग्रिकल्चर पर्पज या प्रकल्पास प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. डॉ. अभिषेक श्रीवास्तव यांनी प्रकल्पास मार्गदर्शन केले. संगणक अभियांत्रिकीचे श्रेयस गांगुर्डे, अथर्व भांगे, प्रथमेश मुजगुरे, गौरव ताजनपुरे यांच्या 'व्हर्च्युअल गाइड टू प्रोव्हाईड इमेर्सिव्ह एक्सपेरियन्स ऑफ गोदा पार्क युजिंग व्ही. आर.' या प्रकल्पासाठी दुसरे पारितोषिक मिळाले.

गार्गी सोनवणे, राजू सुजन, मानस ठाकूर, गौरव कोतवाल या मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील प्रकल्पासाठी तिसरे पारितोषिक मिळाले. डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ चेसिस सेरीज' या विषयावर प्रा. आर. व्ही. भंडारे यांनी मार्गदर्शन केले. चार प्रकल्पांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आली. प्रा. शिल्पा मेणे यांच्या मार्गदर्शनाखाली सौरभ राऊत, घनश्याम शिंदे, अभिषेक पाल, सोनाली गटकळ यांनी 'सेन्सोरमा: ए मेटाव्हर्स फॉर एक्सपेरीएन्सिअल लर्निंग या विषयावर काम केले. चेतन बर्डे, सुमांत शेळके केमिकल इंजिनिअरिंगच्या 'एक्स्ट्रॅक्शन ऑफ ऑइल फ्रॉम वेस्ट डेलोनिया सीड्स अँड इट्स ॲप्लिकेशन फॉर लुब्रिकेंट सिन्थेसिस' प्रकल्पासाठी प्रा. पी. बी. शिवदे यांनी मार्गदर्शन केले. डिझाईन अँन्ड डेव्हलपमेंट ऑफ रोव्हर' या प्रकल्पासाठी तेजस जाधव, शिवम जगताप, प्रथमेश महाजन, रोशन उगले उत्पादन अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांना डॉ. एस. आर. गांगुर्डे यांनी मार्गदर्शन केले.



नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकीतील पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांसह मान्यवर.

sakal newspaper 26-06-2023

पुढारी

# विद्युत अभियांत्रिकीने पटकावला प्रथम क्रमांक

■ के. के. वाघ कॉलेजमध्ये प्रकल्प स्पर्धा उत्साहात

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाच्या आयक्यूएससी सेलमार्फत नुकतीच अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प प्रदर्शन स्पर्धा झाली. यात विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या 'डिझाइन ऑफ व्हॅक्युम सीड ड्रिल फॉर ग्रिकल्चर परपज' या प्रकल्पाला प्रथम मिळला. संगणक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय, तर मेकॅनिकल अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी तृत्तीय क्रमांक पटकाविला.

प्रकल्प प्रदर्शन स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य तथा संचालक डॉ. केशव नांदूरकर यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनात विविध विभागांतील ३०२ प्रकल्पांपैकी २६ प्रकल्प स्पर्धेसाठी निवडले. त्यापैकी सर्वोत्कृष्ट ७ प्रकल्पांना एकूण ३० हजार रुपयांची रोख पारितोषिके देण्यात आली. डॉ. केशव नांदूरकर, डॉ. शिरीष साने, डॉ. प्रीती भामरे, प्रा. नितीन शहाणे यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ झाला.

प्रथम क्रमांक मिळालेला प्रकल्प विद्युत अभियांत्रिकीचे विशाल बागल, प्रयाग श्रेयश, नरेश शिंदे, स्वप्निल सूर्यवंशी या विद्यार्थ्यांनी सादर केला. दरम्यान, विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांपैकी काही प्रकल्प नावीन्यपूर्ण असून, त्यांना पेटंट मिळू शकतात, अशी माहिती डीन क्वालिटी डॉ. प्रीती भामरे यांनी दिली. मिलिंद टांकसाळे, सुयोग झुटे व तनुजा दाते यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून कामकाज पाहिले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



**नाशिक : प्रकल्प स्पर्धेचे प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्युत विभागाच्या विद्यार्थ्यांसोबत मान्यवर.**

My Nashik Edition
Jun 26, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# प्रा. रकिबे प्रथम



नाशिक : कम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया (सीएसआय) नाशिक चॅप्टरद्वारे आयोजित निबंध स्पर्धेत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक विभागाच्या प्रा. प्रिया रकिबे यांना प्रोफेशनल वर्गात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. प्रा. रकिबे यांनी 'कोव्हिड १९ : आयटी उद्योगासाठी वरदान की शाप' या विषयावरील शोधनिबंध सादर केला होता. गेल्या वर्षीदेखील त्यांच्या 'ऑनलाइन शिक्षण : फायदे की तोटे', या निबंधाला पारितोषिक मिळाले होते.

Gavkari 15-06-2023

# प्रा. प्रिया रकिबे यांना प्रथम पारितोषिक

नाशिक : कॉम्पुटर सोसायटी ऑफ इंडिया



(सीएसआय) नाशिक चॅप्टर द्वारे आयोजित निबंध स्पर्धेत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक विभागाच्या प्रा. प्रिया दिनकर रकिबे (दयाळ) यांना प्रोफेशनल वर्गात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. प्रा. प्रिया दिनकर रकिबे यांनी कोविड-१९ : आयटी उद्योगासाठी वरदान की शाप या विषयावरील शोधनिबंधास प्रथम क्रमांक मिळाला आहे. गेल्या वर्षी देखील त्यांच्या ऑनलाइन शिक्षण : फायदे की तोटे या निबंधाला पारितोषिक मिळाले होते. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सर्व संचालक मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, अधिष्ठाता व विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने यांनी त्यांचे अभिनंदन केले.



Founder



Visionary

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित

# के.के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्था, नाशिक

(स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय)

# अभियांत्रिकी आणि कृषी प्रवेश २०२३
# (नियम-प्रक्रिया) मार्गदर्शन व चर्चासत्र

## सर्व इच्छुक विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहून समुपदेशन चर्चासत्राचा लाभ घ्यावा.

प्रमुख मार्गदर्शक

**प्रा.डॉ. डी.एम. चांदवडकर**
अधिष्ठाता व विभागप्रमुख इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन

**मा.डॉ. गोरक्ष व्ही. गर्जे**
सह संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, नाशिक

**रविवार दि. १८ जून २०२३ रोजी सायं. ०५:३० वाजता | स्थळ: कुर्तकोटी शंकराचार्य न्यास सभागृह, गंगापूर रोड, नाशिक**

**डॉ. के. एन. नांदुरकर**
प्राचार्य,
के.के.वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक

**प्रा. के. एस. बंदी**
सचिव,
के.के.वाघ शिक्षण संस्था, नाशिक

**श्री. समीर वाघ**
अध्यक्ष,
के.के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

# प्रा. प्रिया रकिबे यांचे निबंध स्पर्धेत यश

**नाशिक :** कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया (सीएसआय) नाशिक



चॅप्टरद्वारे आयोजित निबंध स्पर्धेत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक विभागाच्या प्रा. प्रिया दिनकर रकिबे (दयाळ) यांना प्रोफेशनल वर्गात यश मिळाले. त्यांच्या 'कोविड १९ : आयटी उद्योगासाठी वरदान की शाप?' या विषयावरील शोधनिबंधाला प्रथम क्रमांक मिळाला. गेल्या वर्षीदेखील त्यांच्या 'ऑनलाइन शिक्षण : फायदे की तोटे?' या निबंधाला पारितोषिक मिळाले होते. के. के. वाघ शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, अधिष्ठाता व विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने आदींनी रकिबे यांचे अभिनंदन केले.

**Pudhari 16-06-2023**

लोकमत

# प्रिया रकिबे यांना प्रथम पारितोषिक

नाशिक : कॉम्पुटर सोसायटी ऑफ इंडिया (सीएसआय) नाशिक चॅप्टर द्वारे आयोजित निबंध स्पर्धेत के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या, संगणक विभागाच्या प्रा. प्रिया दिनकर रकिबे (दयाळ) यांनी प्रोफेशनल वर्गात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. प्रा. प्रिया दिनकर रकिबे यांच्या कोविड १९ : आयटी उद्योगासाठी वरदान की शाप विषयावरील शोधनिबंधास प्रथम क्रमांक मिळाला आहे.



Hello Nashik
Page No. 2 Jun 16, 2023
Powered by: erelego.com



कै. काकासाहेब वाघ

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित

# के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालय, नाशिक

(स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय)



कै. बाळासाहेब वाघ

## "अभियांत्रिकी आणि कृषी प्रवेश-२०२३ नियम व प्रक्रिया"

**मार्गदर्शन व चर्चासत्र**

सर्व इच्छुक विद्यार्थी व पालकांनी उपस्थित राहून समुपदेशन चर्चासत्राचा लाभ घ्यावा.

**प्रमुख उपस्थिती**

मा. डॉ. गोरक्ष गर्जे, प्रभारी सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

स्थळ – कुर्तकोटी शंकराचार्य न्यास सभागृह, गंगापूर रोड, नाशिक

वार व दिनांक : रविवार, दि. १८ जून २०२३

वेळ : सायंकाळी ०५.३० ते ०८.०० वाजता

| | | |
|---|---|---|
| डॉ. के. एन. नांदुरकर<br>प्राचार्य,<br>के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय | प्रा. के. एस. बंदी<br>सचिव,<br>के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक | श्री. समीर बी. वाघ<br>अध्यक्ष<br>के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक |

**Sakal News Paper Dated 17/06/2023**

# उत्तम दर्जाच्या महाविद्यालयात प्रवेश महत्त्वाचा

## डॉ. गर्जे : के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे समुपदेशनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

▸ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २१ : प्रवेश घेताना शाखा महत्त्वाची नसून उत्तम दर्जाच्या महाविद्यालयात प्रवेश घेणे महत्त्वाचे आहे. तसेच अर्ज भरताना घ्यावयाची काळजी, प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यापूर्वी उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक गुणपत्रिका, जात अथवा पडताळणी प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गाचे प्रमाणपत्र, दिव्यांग प्रमाणपत्रासह इतर आवश्यक प्रमाणपत्रे आणि कागदपत्रे तयार ठेवणे सर्वाधिक जबाबदारी व महत्त्वाचे असल्याचे मार्गदर्शन



तंत्रशिक्षण संचालनाल्याचे सहसंचालक डॉ. गोरक्ष व्ही. गर्जे यांनी केले.

सीईटीचा निकाल जाहीर झाल्यानंतर अभियांत्रिकी व कृषी संलग्न विद्या शाखांच्या प्रवेशप्रक्रियेला सुरवात झाली आहे. प्रवेशप्रक्रियेविषयी विद्यार्थी व पालकांमध्ये असलेला संभ्रम दूर करण्यासाठी के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे नुकतेच समुपदेशन व मार्गदर्शन कार्यशाळा झाली. त्याप्रसंगी डॉ. गोरक्ष व्ही. गर्जे प्रमुख म्हणून बोलत होते.

अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. डी. एम. चांदवडकर, अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी प्रास्ताविकात के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात उपलब्ध असणाऱ्या विविध शाखा, महाविद्यालयाला स्वायत्तता मिळाल्याने करण्यात आलेले बदल, एन.बी.ए. व नॅक मानांकन, त्यातून स्पष्ट होणारा उच्च प्रतीचा शैक्षणिक दर्जा, विविध उपक्रम याबाबत पालक-विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. एन. जी. देवशेटे यांनी कृषी प्रवेश प्रक्रियेसंबंधित माहिती दिली.

कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सर्व संचालक मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांचे मार्गदर्शन लाभले. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले.

**sakal 22-06-2023**